# श्रमदानातून मूल्यांची जोपासना होते

## सभापती राजाभाऊ जगदाळे डी. पी. भोसले कॉलेजचे मौजे आझादपूर येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर

वार्ताहर

एकंबे

शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होण्याच्या दृष्टीने विशेष श्रमसंस्कार शिबिर महत्वाचे आहे. यातूनच ग्रामीण भागातील समाजजीवन व त्याची संस्कृती व समस्या समजतात. अपेक्षित ध्येय साध्य करण्यासाठी प्रामाणिकपणा व कष्ट महत्वाचे आहे. श्रमदानातून मूल्यांची जोपासना होते, असे प्रतिपादन कोरेगाव पंचायत समितीचे सभापती राजाभाऊ जगदाळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डी. पी. भोसले कॉलेज व जिल्हा परिषद सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने कोरेगाव तालुक्यातील मौजे आझादपूर येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राजाभाऊ जगदाळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रिं. डॉ. विजयसिंह सावंत उपस्थित होते.



**आझादपूरः विशेष श्रमसंस्कार शिबिर उद्‌घाटनप्रसंगी बोलताना राजाभाऊ जगदाळे.**

अध्यक्षीय भाषणात प्रिं. डॉ. सावंत म्हणाले राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कारातून विद्यार्थ्यांच्यात सामाजिक बांधालिकीचे नाते निर्माण होते. कष्टामुळेच मानवी जीवनाला विकासात्मक कलाटणी मिळते. यातूनच देशाचा एक आदर्श नागरिक, समाजसेवक, कलावंत व उद्योगपती बनू शकतो.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतिश सायकर व डॉ. दत्तात्रय कोरडे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रकल्प अधिकारी प्रा. प्रदीप पवार यांनी मानले.